ePaper


## काँग्रेसची मोठी खेळी! संजय दत्तना दिली हरियाणाची जबाबदारी

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 27 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 3 वरुन...

'विषारी दारू' प्रकरणात सरकार ॲक्शन मोडवर!

### सरचिटणीस आणि विश्वस्तांचा राजीनामा

# राम मंदिर देणगी गैरव्यवहार प्रकरण

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी मंदिरातील कथित देणगी गैरव्यवहार प्रकरणाने मोठे वळण घेतले असून, श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय आणि ट्रस्टी डॉ. अनिल मिश्रा यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारत आपल्या पदांचा राजीनामा दिला आहे. मंदिर निर्माण प्रभारी गोपाळ राव यांनाही व्यवस्थापनातून दूर करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. एसआयटीच्या प्राथमिक अहवालानंतर ही कारवाई करण्यात आली असून, या घडामोडींमुळे ट्रस्टच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.**

काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या अयोध्या दौऱ्यावेळी चंपत राय यांना अधिकृत कार्यक्रम व बैठकींपासून दूर ठेवण्यात आले होते. त्यानंतर त्यांच्या पदाबाबत चर्चा सुरू झाली होती. दरम्यान, देणगी गैरव्यवहार प्रकरणी दाखल एफआयआरनंतर पोलिसांनी रामशंकर यादव उर्फ टिन्नू यादवसह आठ जणांना अटक केली. शुक्रवारी सर्व आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली.

एसआयटीने २३ जून रोजी उत्तर प्रदेश सरकारला प्राथमिक अहवाल सादर केला होता. त्यानंतर झालेल्या कारवाईत अटक करण्यात आलेल्यांमध्ये लवकुश मिश्रा आणि अनुकल्प मिश्रा हे ट्रस्टी अनिल मिश्रा यांचे नातेवाईक असल्याची माहिती समोर आली आहे, तर मनीष यादव हा टिन्नू यादवचा पुतण्या असल्याचे तपासात नमूद करण्यात आले आहे.

## आरोपी ट्रस्टींचे नातेवाईक?

१३ जून रोजी उत्तर प्रदेश सरकारने स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाने २३ जून रोजी गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय प्रसाद यांना प्राथमिक अहवाल सोपवला होता. या अहवालानंतर ही अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्यांमध्ये लवकुश मिश्रा आणि अनुकल्प मिश्रा हे ट्रस्टी अनिल मिश्रा यांचे नातेवाईक असल्याचे सांगितले जात आहे, तर मनीष यादव हा टिन्नू यादवचा पुतण्या आहे.

## ८ आरोपींना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

चढावा चोरी प्रकरणी एफआयआर दाखल वेगाने कारवाई करत उर्फ टिन्नू यांच्यासह ८ अटक केली होती. आरोपींची वैद्यकीय न्यायदंडाधिकारी करण्यात आले. आरोपींना १४ कोठडी सुनावत

गुरुवारी उशिरा पहिली झाल्यानंतर पोलिसांनी रामशंकर यादव आरोपींना रात्रीच आज, शुक्रवारी या सर्व ८ चाचणी करून त्यांना मुख्य न्यायालयात हजर न्यायालयाने सर्व दिवसांची न्यायालयीन जेलमध्ये पाठवले आहे.




## ट्रस्टचे पुनर्गठन होणार; निवृत्त IAS किंवा न्यायाधीशांची CEO पदी वर्णी लागणार?

चंपत राय आणि अनिल मिश्रा यांच्या राजीनाम्यानंतर आता श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे पुनर्गठन करण्याची तयारी सुरू झाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, आता ट्रस्टच्या दैनंदिन कामकाजासाठी एका निवृत्त आयएएस अधिकाऱ्याची किंवा निवृत्त न्यायाधीशांची 'सीईओ' म्हणून नियुक्ती केली जाऊ शकते. ट्रस्टच्या पुनर्गठनाचा आणि नवीन विश्वस्तांच्या नियुक्तीचा अंतिम निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी, सरसंघचालक मोहन भागवत आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या संमतीनेच घेतला जाईल.




दरम्यान, चंपत राय आणि अनिल मिश्रा यांच्या राजीनाम्यानंतर श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या पुनर्गठनाची प्रक्रिया सुरू झाली आहे. ट्रस्टच्या दैनंदिन कामकाजासाठी निवृत्त आयएएस अधिकारी किंवा निवृत्त न्यायाधीश यांची मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) म्हणून नियुक्ती करण्याचा विचार सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. नवीन विश्वस्तांची नियुक्ती आणि ट्रस्टच्या पुनर्गठनाबाबतचा अंतिम निर्णय केंद्र आणि राज्य नेतृत्वाच्या चर्चेनंतर घेतला जाण्याची शक्यता आहे.

# केतन अगरवाल खून प्रकरणा नवा खुलासा

## केसांचा विग आणि बोलण्यातील अडखळणे पसंत नसल्याने सियाची नापसंती

**महाईन्यूज । पुणे**

**टक्कल असल्याने वापरत असलेला केसांचा विग आणि बोलण्यातील अडळतेपणा या कारणांमुळे केतन नापसंत असल्याचा दावा सिया गोयल हिने केल्याची माहिती तपासामध्ये उघड झाली आहे. प्रियकराच्या मदतीने भावी पतीचा लोहगडावरून ढकलून देत केलेल्या खून प्रकरणामध्ये नवीन खुलासा समोर आला असून या प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याचे स्पष्ट झाले आहे.**



केतन विशाल अगरवाल (वय २५ रा. लोढा बेलमोंडो टॉवर गहुंजे, ता. मावळ) असे खून झालेल्या व्यावसायिकाचे नाव आहे. या प्रकरणी सिया प्रवीण गोयल (वय २० रा. लीलाकुंज, ७८ / २१ न्यू एरा सोसायटी, गंगाधाम समोर, कोंढवा रस्ता, बिबवेवाडी) आणि चेतन बाबुलाल चौधरी (वय २२, रा. पार्श्वनगर, बी ४/३०१ कोंढवा बुद्रूक) यांना पोलिसांनी अटक केली आहे.

पिंपरी चिंचवडमधील बांधकाम व्यावसायिक विशाल अगरवाल यांचा मुलगा केतन आणि मार्केट यार्डातील मसाले विक्रीचे व्यापारी प्रवीण गोयल यांची मुलगी सिया यांचा साखरपुडा झाला होता. तत्पूर्वी केतनच्या वडिलांनी मुलाला टक्कल असून, तो विग वापरत असल्याची माहिती सियाच्या कुटुंबाला दिल्याचे सांगितले होते. केतन बोलताना अडखळत होता. तसेच त्याला केसांचा विग असल्याचा दावा सियाने केला. मात्र, लग्न मोडून कुटुंबाची बदनामी टाळण्यासाठी तिने यासंदर्भात वाच्यता केली नाही. सियाला केतनसोबत लग्न करणे मान्य नसल्यामुळे तिने आरोपी चेतन चौधरीच्या मदतीने लोहगडावरून ढकलून देत १८ जून रोजी केतनचा खून केला.

केतनमधील दोन उणीवा सियाला खटकल्या होत्या. टक्कल असल्याने तो विग लावत होता. ही गोष्ट अनेकांना माहिती नव्हती. तसेच बोलताना अडखळत असल्याची बाब सियाला साखरपुड्यानंतर माहिती झाली होती. लग्नानंतर आपल्याला याच्यासोबत राहावे लागेल, याचीही तिला चिंता होती. त्यातच तिचा मित्र चेतन चौधरी हा केतनपेक्षा 'स्मार्ट' असल्याचे सियाला वाटत होते.

साखरपुड्यानंतर ठरलेले लग्न मला मोडून घरच्यांना दुखवायचे नव्हते. लग्न मोडले असते तर आमच्या कुटुंबाची प्रतिष्ठा धुळीला मिळाली असती. त्यापेक्षा केतनला आपल्यातून बाजूला काढण्याचा पर्याय योग्य वाटला. त्यासाठी गुगल सर्चद्वारे माहिती घेत, लोहगड ट्रेकींग रेकी करीत योजना यशस्वी केल्याची कबुली सियाने दिली आहे. ट्रेकिंगवेळी केतनचा मृत्यू झाल्यास जास्त संशय येणार नाही. गडावर फारसे सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने ही गोष्ट कोणालाही समजणार नसल्याचे सियाला वाटले. त्यामुळे तिने केतनची हत्या केली. आरोपी सिया हिचे वडील सध्या रुग्णालयात उपचार घेत आहेत.

दरम्यान, या प्रकरणी लोणावळा पोलिसांनी शुक्रवारी (२६ जून) तिचा भाऊ साहील गोयल याला चौकशीसाठी बोलावले होते. त्याच्याकडून पोलिसांनी माहिती घेतली आहे. तो सध्या पोलीस ठाण्यात असून त्याची चौकशी सुरू आहे.

### मुख्यमंत्र्यांची भेट

केतन अग्रवाल हत्याकांडातील आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, मुलाला न्याय मिळावा, या मागणीसाठी केतनचे वडील विशाल अगरवाल यांनी शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पुण्यात भेट घेतली. 'दोषींना कठोर शिक्षा व्हावी, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. कुटुंबीयांना न्याय देण्यासाठी कसूर ठेवली जाणार नाही,' असे आश्वासन फडणवीस यांनी त्यांना दिले आहे. दरम्यान, प्रकरण जलदगती न्यायालयात चालवावे. तसेच विशेष सरकारी वकिल म्हणून ॲड उज्वल निकम यांची नियुक्ती करावी,' अशी मागणी अगरवाल कुटूंबियांनी केली आहे. याबाबत फडणवीस यांनी विधी व न्याय विभागाच्या सचिवांना निर्देश दिले आहेत.

# काळ आला होता, पण वेळ आली नव्हती..! आळेफाटा बायपासवर कारचा अपघात

**महाईन्यूज । पुणे**

**महामार्गावरील प्रवास कधी जीवघेणा ठरेल, याचा नेम नसतो. शुक्रवारी दुपारी सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास आळेफाटा बायपासवर हृदयाचा ठोका चुकवणारा भीषण अपघात घडला. पुण्याच्या दिशेने कुटुंबासह प्रवास करणाऱ्या भरधाव कारवरील चालकाचे अचानक नियंत्रण सुटले.**



त्यानंतर कारने महामार्गावर २ ते ३ वेळा पलटया घेतल्या आणि रस्त्यालगत असलेल्या एका घराच्या पडवीवर जाऊन जोरदार धडक दिली.

अधिकच्या माहितीनुसार, अपघाताचा आवाज इतका प्रचंड होता की परिसरातील नागरिक घटनास्थळी धावत आले. कारची अवस्था पाहून आतमध्ये असलेल्या प्रवाशांचे काय झाले असेल, याची भीती सर्वांनाच वाटत होती. मात्र, स्थानिकांनी प्रसंगावधान राखत कारमधील जखमींना तातडीने बाहेर काढले.

कारमधून दीड वर्षांचे बाळ आणि तीन वर्षांचा मुलगा बाहेर काढण्यात आला. अपघाताचा धक्का आणि आई-वडिलांची अवस्था पाहून दोन्ही मुले घाबरून रडू लागली. अशा वेळी स्थानिक नागरिकांनी माणुसकीचे दर्शन घडवत मुलांना चॉकलेट दिले, त्यांच्याशी प्रेमाने संवाद साधला आणि त्यांना शांत केले. या अपघातात तीन वर्षांचा मुलगा पूर्णपणे सुखरूप बचावला, तर दीड वर्षांच्या बाळाला किरकोळ दुखापत झाली. अपघाताची माहिती मिळताच पोलिस आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली. जखमींना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### पती-पत्नी गंभीर जखमी; उपचार सुरू

अपघातात कारमधील पती आणि पत्नी गंभीर जखमी झाले आहेत. स्थानिकांनी रुग्णवाहिकेची वाट न पाहता दोघांनाही तातडीने आळेफाटा येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. सध्या त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी मोठी गर्दी झाली होती. सुदैवाने या भीषण अपघातात मोठी जीवितहानी टळली. 'देव तारी त्याला कोण मारी' या म्हणीचा प्रत्यय या घटनेत आला. स्थानिक पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून अपघाताचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे.

# 'विषारी दारू' प्रकरणात सरकार ॲक्शन मोडवर!

## मुख्य आरोपींवर मोक्का; २२ मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी ५ लाखांची मदत

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे व पिंपरी-चिंचवडमधील दापोडी, फुगेवाडी आणि हडपसर परिसरात घडलेल्या विषारी दारू प्रकरणावर विधान परिषदेत आमदार अमित गोरखे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित करत दोषींवर कठोर कारवाई, मृतांच्या कुटुंबांना आर्थिक मदत आणि अवैध दारू व्यवसायाविरोधात व्यापक मोहीम राबविण्याची मागणी केली. या गंभीर प्रकरणाची दखल घेत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात सविस्तर लिखित उत्तर सादर केले, तर गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी शासनाच्या पुढील कारवाईची माहिती दिली.**




### शासनाचे ठोस निर्णय

विषारी दारू प्रकरणाचा तपास सीआयडीकडे वर्ग करण्यात आला असून मुख्य आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाईची प्रक्रिया सुरू आहे. मिथेनॉल पुरवठा साखळीची चौकशी सुरू असून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. मृतांच्या २२ कुटुंबांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपये, अशी एकूण १.१० कोटी रुपयांची मदत मंजूर करण्यात आली असून राज्यभर अवैध दारूविरोधी विशेष मोहीम, तालुकास्तरीय दारूबंदी समित्यांचे पुनर्गठन आणि मिथेनॉल वाहतुकीवर कठोर नियंत्रणाचे निर्देश शासनाने दिले आहेत.

मुख्यमंत्र्यांच्या लिखित उत्तरानुसार, विषारी दारू प्रकरणाचा तपास सीआयडीकडे वर्ग करण्यात आला असून, विषारी दारू निर्मितीसाठी वापरण्यात आलेल्या मिथेनॉलचा पुरवठा करणाऱ्या मुख्य आरोपींना अटक करण्यात आली आहे. संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवरही निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले की, या प्रकरणातील मुख्य आरोपींवर मोक्का (MCOCA) अंतर्गत कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू असून, दोषींना कोणतीही सवलत दिली जाणार नाही. संपूर्ण अवैध रॅकेट उद्ध्वस्त करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या २२ जणांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यासाठी एकूण १ कोटी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, पीडित कुटुंबांना तातडीचा दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

याशिवाय, राज्यभर अवैध दारू निर्मिती, वाहतूक व विक्री रोखण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तालुकास्तरीय दारूबंदी समित्यांचे पुनर्गठन, पोलिस व उत्पादन शुल्क विभागाच्या संयुक्त कारवाया आणि मिथेनॉलच्या वाहतुकीवर अधिक कठोर नियंत्रण ठेवण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

यावेळी आमदार अमित गोरखे म्हणाले, "विषारी दारूमुळे २२ निष्पाप नागरिकांचा मृत्यू ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. पीडित कुटुंबांना न्याय मिळावा, दोषींना कठोर शिक्षा व्हावी आणि अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी मी सभागृहात ठाम भूमिका मांडली. शासनाने घेतलेले निर्णय दिलासादायक असून, दोषींना शिक्षा होईपर्यंत आणि पीडितांना पूर्ण न्याय मिळेपर्यंत या प्रकरणाचा पाठपुरावा सुरू राहील."

# ठेकेदारांना 'रेड कार्पेट'; विद्यार्थी मात्र अनवाणी शाळेत!



> "मे महिन्यातच याबाबत उपायुक्त व शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना निर्देश दिले होते. प्रशासनाने तातडीने निविदा प्रक्रिया राबवत मुलांना शालेय साहित्य दिले पाहिजे." - **रविना आंगोळकर, सभापती, शिक्षण समिती.**

### शालेय साहित्य वितरणाचा खोळंबा

महापालिकेच्या १०५ प्राथमिक, १८ माध्यमिक आणि २०३ बालवाडी शाळांतील सुमारे ५१ हजार विद्यार्थ्यांना दरवर्षी रेनकोट, शूज, दप्तर आणि वह्या मोफत दिल्या जातात. मात्र, यंदा डीबीटीसाठीची निविदा प्रक्रिया रखडल्याने साहित्य वितरणाला विलंब झाला आहे. जून महिना संपत आला तरी विद्यार्थ्यांना आवश्यक साहित्य मिळाले नसून अनेकांना पावसात अनवाणी शाळेत जावे लागत आहे. शिक्षण विभागाने पुढील १५ दिवसांत निविदा प्रक्रिया पूर्ण करून साहित्य वितरण सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे.

> "निविदा नोटीस काढली आहे. सात दिवसांची अल्पमुदतीची निविदा असेल. त्यानंतर तातडीने स्थायीची मान्यता घेऊन ठेकेदारी संस्थांना कामाचा आदेश देण्यात येईल. पंधरा दिवसांत सर्व प्रक्रिया पूर्ण करून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देण्यात येईल." - **ममता शिंदे, उपायुक्त, शिक्षण विभाग.**

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**महापालिकेच्या शिक्षण विभागामार्फत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य खरेदीसाठी थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) योजना राबविली जात असली, तरी यंदा निविदा प्रक्रियेलाच विलंब झाल्याने सुमारे ५१ हजार विद्यार्थ्यांना रेनकोट, शूज, दप्तर आणि वह्यांची प्रतीक्षा करावी लागत आहे. जून महिना संपत आला असूनही साहित्याचे वितरण न झाल्याने अनेक विद्यार्थ्यांना पावसात अनवाणी शाळेत जाण्याची वेळ आली आहे.**

महापालिकेच्या १०५ प्राथमिक, १८ माध्यमिक आणि २०३ बालवाडी शाळांमधील विद्यार्थ्यांना दरवर्षी मोफत शालेय साहित्य दिले जाते. यामध्ये कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो. साहित्य वितरणातील पारदर्शकता वाढविण्यासाठी दोन वर्षांपूर्वी डीबीटी पद्धत सुरू करण्यात आली. मात्र, त्यात अनेक त्रुटी आढळल्याने यंदा सुधारित पद्धतीनुसार निविदा प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या प्रक्रियेनुसार निवड झालेला ठेकेदार विद्यार्थ्यांना साहित्य देणार असून त्याचे पैसे थेट संबंधित संस्थेला अदा केले जाणार आहेत. मात्र, अद्याप निविदा प्रक्रिया पूर्ण न झाल्याने साहित्य वितरण रखडले आहे. गणवेश वेळेत मिळाले असले, तरी रेनकोट, शूज, वह्या आणि दप्तर न मिळाल्याने पालकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

दरम्यान, मर्जीतील ठेकेदारांना काम मिळावे यासाठी अटी-शर्तींमध्ये बदल आणि टक्केवारीच्या राजकारणामुळेच निविदा प्रक्रियेला विलंब झाल्याची चर्चा असून त्याचा फटका विद्यार्थ्यांना बसत असल्याचा आरोप होत आहे.

याबाबत शिक्षण विभागाच्या उपायुक्त ममता शिंदे यांनी, "निविदा नोटीस प्रसिद्ध करण्यात आली असून सात दिवसांची अल्पमुदतीची निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल. त्यानंतर स्थायी समितीची मंजुरी घेऊन कामाचे आदेश दिले जातील. पुढील पंधरा दिवसांत सर्व प्रक्रिया पूर्ण करून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य उपलब्ध करून देण्यात येईल," असे सांगितले.

तर शिक्षण समितीच्या सभापती रविना आंगोळकर यांनी, "मे महिन्यातच प्रशासनाला आवश्यक सूचना दिल्या होत्या. आता विलंब न करता निविदा प्रक्रिया पूर्ण करून विद्यार्थ्यांना तातडीने शालेय साहित्य उपलब्ध करून द्यावे," अशी मागणी केली.



## भूमिका

**महाराष्ट्रातील शेतकरी हा निसर्ग आणि शासन या दोन्हींच्या निर्णयांवर अवलंबून असतो. त्यामुळे पाऊस उशिरा झाला किंवा सरकारी योजनांमध्ये अडथळे निर्माण झाले, तर त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या जीवनावर होतो. यंदाचा खरीप हंगाम सुरू होताना राज्यातील शेतकरी अशाच दुहेरी संकटाच्या विळख्यात अडकला होता.**

# दिलासादायी पाऊस, अपेक्षांची कर्जमाफी!



एकीकडे मान्सूनच्या विलंबामुळे पेरण्या खोळंबल्या होत्या, तर दुसरीकडे सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेतील जाचक अटींमुळे शेतकरी चिंतेत होता. मात्र, गेल्या काही दिवसांत निसर्गाने दिलेला दिलासा आणि शासनाने अटींमध्ये बदल करण्याचे दिलेले आश्वासन यामुळे आशेचा नवा किरण दिसू लागला आहे.

जून महिन्याच्या पहिल्या तीन आठवड्यांत राज्यात अत्यल्प पाऊस झाल्याने खरीप हंगाम धोक्यात येण्याची भीती निर्माण झाली होती. पेरण्या रखडल्या, धरणांतील पाणीसाठा चिंताजनक पातळीवर राहिला आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर त्याचे परिणाम दिसू लागले. मात्र, अखेर मान्सूनने राज्यात दमदार पुनरागमन केले. अनेक भागांत समाधानकारक पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी पुन्हा पेरण्यांना सुरुवात केली आहे. उशिरा का होईना, पण निसर्गाने दिलेला हा दिलासा खरीप हंगामाला नवसंजीवनी देणारा ठरू शकतो.

दुसरीकडे, सरकारच्या कर्जमाफी योजनेबाबत सुरुवातीपासूनच अनेक प्रश्न उपस्थित होत होते. दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीसाठी ठेवलेल्या अटी, अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना आधी उर्वरित रक्कम भरण्याची सक्ती, तसेच पूर्वी कर्जमाफी घेतलेल्या शेतकऱ्यांना वगळण्याचा निर्णय यामुळे मोठ्या प्रमाणावर नाराजी निर्माण झाली. अनेक शेतकरी प्रत्यक्ष लाभापासून वंचित राहतील, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. शिवाय, बँकांकडून कर्ज पुनर्गठनाच्या प्रक्रियेत झालेल्या त्रुटींमुळे अनेक शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडला आहे.

या पार्श्वभूमीवर विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विरोधकांनी हा मुद्दा जोरदारपणे उपस्थित केला. त्यानंतर मुख्यमंत्री आणि संबंधित मंत्र्यांनी कर्जमाफीतील जाचक अटी दूर करण्याचे आश्वासन दिले. हे आश्वासन स्वागतार्ह असले, तरी त्याची तातडीने आणि प्रामाणिक अंमलबजावणी होणे अधिक महत्त्वाचे आहे. केवळ घोषणा करून शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढविण्यापेक्षा प्रत्यक्ष लाभ त्यांच्या हातात पोहोचणे गरजेचे आहे.

शेतकरी हा केवळ अन्नदाता नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्याच्या चेहऱ्यावरचे समाधान म्हणजे संपूर्ण समाजाच्या प्रगतीचे प्रतीक असते. त्यामुळे निसर्गाने दिलेल्या पावसाच्या साथीसोबत शासनानेही संवेदनशील भूमिका घेतली, तरच खरीप हंगाम यशस्वी ठरेल. पावसाचे पाणी आणि कर्जमाफीचा लाभ या दोन्हींचा योग्य संगम झाला, तर शेतकऱ्यांच्या शेतात भरघोस पीक आणि घरात समृद्धीचे दिवस नक्कीच परततील. संकटांचे ढग दूर करून आशेची पालवी फुलविण्याची हीच योग्य वेळ आहे.

## प्रासंगिक »

### सोन्याचा मुकुट आणि चांदीचे पाय

**एका शहरातील श्रीविष्णू मंदिरासाठी भक्तांनी भगवानाला सोन्याचा मुकुट अर्पण करण्याचा संकल्प केला. त्यासाठी ते श्रीमंत भिकुशेठ यांच्याकडे मदतीसाठी गेले.**

मात्र, भिकुशेठ म्हणाले, "मी विष्णुला सोन्याचा मुकुट नव्हे, तर चांदीचे पाय देणार आहे."

दोन दिवसांनी त्यांनी सर्वांना बोलावले. तेव्हा त्यांच्या शेजारी 'विष्णू' नावाचा एक अनाथ व अपंग मुलगा बसला होता. त्याला दोन्ही पाय नव्हते. भिकुशेठ यांनी शहरातून आणलेले कृत्रिम पाय त्या मुलाला बसविण्यात आले.

पाय मिळताच मुलगा आनंदाने चालू लागला. हे पाहून भिकुशेठ म्हणाले, "देवाच्या मूर्तीला सोन्याचा मुकुट घातल्याने जितका आनंद होईल, त्यापेक्षा या गरजू विष्णूला पाय देऊन त्याचे आयुष्य बदलणे अधिक महत्त्वाचे आहे.

गरजूंना मदत करणे हीच खरी देवपूजा आहे."

- तात्पर्य : **मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा; गरजूंची मदत करणे हेच सर्वश्रेष्ठ पुण्य आहे.**


पारपत्र हे नागरिकत्वाचा पुरावा नसल्याचे परराष्ट्र खात्याच्या अधिकाऱ्यांनी केलेले विधान कायद्याच्या चौकटीत योग्य असले, तरी त्यामुळे सामान्य नागरिकांच्या मनात मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.

# ओळखपत्रांचा गोंधळ आणि नागरिकांचा संभ्रम

कारण आज भारतीय नागरिकाकडे आधार, पॅन, रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, वाहन परवाना, पारपत्र अशा अनेक ओळखपत्रांचा संच असतो; मात्र त्यांपैकी कोणतेच दस्तऐवज नागरिकत्वाचा अंतिम पुरावा मानले जात नाहीत. त्यामुळे "नेमके नागरिकत्व सिद्ध कशाने करायचे?" हा मूलभूत प्रश्न अधिकच तीव्र झाला आहे.

पारपत्र मिळवताना अर्जदाराची सखोल पडताळणी केली जाते. पोलीस चौकशी, निवासाचा पुरावा आणि इतर कागदपत्रांच्या आधारेच पासपोर्ट जारी केला जातो. तरीही कायदेशीरदृष्ट्या तो नागरिकत्वाचा पुरावा नसून केवळ आंतरराष्ट्रीय प्रवासासाठीचे अधिकृत दस्तऐवज आहे. कायद्याच्या दृष्टीने हे योग्य असले, तरी सामान्य नागरिकासाठी हा फरक समजणे सहज शक्य नाही.

गेल्या काही वर्षांत विविध सरकारी योजनांमुळे ओळखपत्रांचे महत्त्व प्रचंड वाढले आहे. बँक व्यवहार, शासकीय अनुदाने, मतदान, आरोग्य योजना, करप्रणाली, प्रवास



अशा प्रत्येक क्षेत्रासाठी वेगवेगळी कागदपत्रे आवश्यक ठरतात. अनेकदा त्यांची परस्पर जोडणी बंधनकारक केली जाते. परिणामी, नागरिकांकडे अनेक ओळखपत्रे असली तरी त्यातून नागरिकत्व किंवा कायदेशीर हक्कांची संपूर्ण हमी मिळत नाही, अशी विसंगती निर्माण झाली आहे.

मतदार ओळखपत्राच्या संदर्भातही काही ठिकाणी नाव मतदार यादीत असूनही मतदानाचा अधिकार बजावता न आल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे ओळखपत्र असणे आणि त्या आधारे संबंधित हक्क बजावता येणे, या दोन वेगळ्या गोष्टी असल्याचे वास्तव समोर आले आहे. ही परिस्थिती नागरिकांच्या शासनावरील विश्वासाला धक्का देणारी आहे.

आज अनेक विकसित देशांमध्ये नागरिकत्वासाठी स्वतंत्र आणि स्पष्ट ओळख प्रणाली आहे. भारतात मात्र विविध उद्देशांसाठी वेगवेगळी कागदपत्रे असूनही नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी एकसंध व्यवस्था नाही. त्यामुळे प्रत्येक नवीन नियम किंवा स्पष्टीकरणानंतर संभ्रम निर्माण होतो. यावर दीर्घकालीन उपाय म्हणून नागरिकत्व, ओळख आणि शासकीय सेवांसाठी सुसंगत, पारदर्शक आणि विश्वासार्ह प्रणाली विकसित करणे आवश्यक आहे.

लोकशाही व्यवस्थेत नागरिकांची ओळख आणि त्यांच्या अधिकारांचे संरक्षण हे शासनाचे मूलभूत कर्तव्य आहे. त्यामुळे कायदेशीर तरतुदी स्पष्ट असण्याबरोबरच त्या सर्वसामान्यांना सहज समजतील अशा पद्धतीने मांडणेही तितकेच गरजेचे आहे. अन्यथा ओळखपत्रांची संख्या वाढत राहील, पण नागरिकांच्या मनातील संभ्रम आणि असुरक्षिततेची भावना कमी होणार नाही.

## ।। अभंगवाणी ।।



प्रारब्धा हातीं जन ।
सुख सीण पावसे ॥१॥

करितां घायाळांचा संग ।
अंगें अंग माखावें ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शिवसेनेचा अस्त होताना बघवत नाही

## बाळासाहेबांचा आवाज महाराष्ट्राची गरज होती, आज.; नारायण राणेंनी व्यक्त केली खंत

**महाईन्यूज । मुंबई**

**जो पक्ष मी सुरुवातीपासून पाहिला, त्याचा अस्त होताना पाहावत नाही. बाळासाहेबांचा आवाज महाराष्ट्राची गरज होती. आज काय झालंय? पूर्वीची शिवसेना आता राहिली नाही, असे खेदजनक विधान माजी केंद्रीय मंत्री तथा रत्नागिरी-सिंधुदुर्गचे खासदार नारायण राणे यांनी पत्रकार परिषदेत केले. गुरुवारी विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने ते रत्नागिरीत आले असता त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात विविध विभागप्रमुखांसोबत आढावा बैठक घेतली.**



यावेळी पत्रकारांनी खासदार राणे यांना 'ऑपरेशन टायगर'बाबत प्रतिक्रिया विचारली असता ते म्हणाले, ऑपरेशन टायगर भाजपला धोकादायक नाही, हे परिस्थितीनुसार कळेल. यात वाघाचे गुणधर्म कुठे दिसले नाहीत, अशी मिश्किलीही त्यांनी केली. संजय राऊत यांनी खासदार संजय पाटील यांना अटकेची मागणी करतानाच अमित शहा यांची कवचकुंडले घेऊन पुढे येऊ नका असे विधान केले आहे. यावर मत व्यक्त करताना राणे यांनी संजय राऊत हे एक 'एमपीए' आहेत, त्यांनी असे विधान करणे कितपत योग्य आहे, असा प्रतिप्रश्न केला. राऊत आजारपणामुळे असली विधाने करत असावेत, असा टोलाही त्यांनी दिला.

खासदार राणे यांनी दोन्ही शिवसेनांबाबत बोलण्यास फारसे स्वारस्य दाखविले नाही. ते म्हणाले, कोकणात भाजप चांगल काम करतोय. यात गुणी लोक आहेत. सध्या विरोधी पक्ष नाही, यावर ते म्हणाले की, हे योग्य नाही. लोकशाही टिकण्यासाठी विरोधी पक्षाचा प्रमुख रोल असतो. मात्र, तोच आता शिल्लक नसल्याचे त्यांनी सांगितले. बाळासाहेबांच्या शिवसेनेबद्दल ते म्हणाले की, मी ज्या पक्षात पूर्वीपासून होतो, त्या पक्षाचा अस्त होताना वाईट वाटते.

राज्यातील बदलत्या राजकीय घडामोडींवरही त्यांनी भाष्य करताना भाजपची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत होत असल्याचा दावा केला. जनतेच्या विश्वासामुळे भाजपला सातत्याने पाठिंबा मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले. विरोधकांनी केवळ आरोप-प्रत्यारोपांमध्ये वेळ घालवण्याऐवजी जनतेच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन त्यांनी केले.

कोकणातील विकासकामांमुळे नागरिकांमध्ये सकारात्मक वातावरण असल्याचेही त्यांनी सांगितले. आगामी काळात पक्षसंघटना अधिक बळकट करण्यावर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राजकारणात संयम आणि जबाबदारीने वक्तव्य करणे आवश्यक असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. जनतेच्या हिताला प्राधान्य देत विकासाची गती कायम ठेवण्याचा भाजपचा निर्धार असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातील राजकीय समीकरणे बदलत असली तरी भाजपच्या कार्यपद्धतीवर त्याचा कोणताही परिणाम होणार नसल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. लोकशाहीत सशक्त विरोधी पक्ष आवश्यक असला तरी तो जनतेच्या प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठवणारा असावा, असेही ते म्हणाले. पत्रकार परिषदेत विविध राजकीय विषयांवर प्रश्न विचारण्यात आले असले तरी त्यांनी विकास, संघटन आणि जनतेच्या विश्वासावरच अधिक भर दिला.

### काम मुदतीत झाले नाही

विविध विभागांचा आढावा चांगला झाल्याचे खासदार राणे यांनी सांगितले. महामार्गाच्या कामाबाबत ते म्हणाले, दि. १६ जूनपर्यंत महामार्गाचे काम होणार असे सांगितले होते. परंतु ते झाले नाही. याबाबत संबंधित यंत्रणेकडून माहिती घेऊ, असे त्यांनी सांगितले. जलजीवन मिशन, बीएसएनएल, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, कुपोषित बालके, दरडोई उत्पन्न, रत्नागिरी विमानतळ याबाबतही अधिकाऱ्यांशी बोलू, असे ते म्हणाले. प्रकल्पाशिवाय वीज, विजेशिवाय इंडस्ट्री येईल का आणि इंडस्ट्रीशिवाय बेकारी जाईल का? अणुऊर्जा प्रकल्पामुळे एक लाख नोकऱ्या येणार आहेत. इथे जे जे प्रकल्प आले, त्यांना विरोध करून काय झालं? अणुऊर्जा प्रकल्प आला असता तर वीज मिळाली असती.

# आदित्य ठाकरेंकडे लवकरच शिवसेनेची धुरा? ठाकरे गटातील खासदाराचे संकेत

**महाईन्यूज । मुंबई**

**शिवसेनेत पडलेल्या उभ्या फुटीनंतरही पक्ष आजही जमिनीवर तितकाच भक्कम आहे. तसेच आदित्य ठाकरे यांच्यात पक्षाचे नेतृत्व करण्याची पूर्ण क्षमता असून, तरुण पिढीने आता पक्षाची धुरा हाती घेतली पाहिजे, असे मत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी व्यक्त केले आहे.**





शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आगामी महाराष्ट्र दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी 'पीटीआय'शी (PTI) संवाद साधला. अलीकडेच पक्षाची साथ सोडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणाऱ्या सहा खासदारांवर त्यांनी यावेळी कडाडून टीका केली. केवळ सत्ता, पैसा आणि स्वतःच्या संरक्षणासाठीच या नेत्यांनी निष्ठा बदलल्याचा गंभीर आरोप राऊत यांनी केला.

आदित्य ठाकरे यांच्या पक्षामधील आगामी भूमिकेबद्दल विचारले असता संजय राऊत म्हणाले, "तरुण पिढीने आता हळूहळू पक्षाची मोठी जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली पाहिजे. आम्ही गेली ४० वर्षे सातत्याने पक्षासाठी काम करत आहोत, आणखी किती वर्षे करणार? आता तरुण नेत्यांनी पक्षाची कमान हाती घेणे गरजेचे आहे आणि आदित्य ठाकरे ते सध्या करतच आहेत." ते पुढे म्हणाले की, आदित्य ठाकरे येत्या काळात अधिकृतपणे ही जबाबदारी स्वीकारतील. त्यांच्यामध्ये पक्षाचे नेतृत्व करण्याची पूर्ण क्षमता असून, आम्ही सर्व ज्येष्ठ नेते त्यांचे पक्षात मनापासून स्वागत करू.

संजय राऊत यांच्या या विधानामुळे आता आदित्य ठाकरे यांच्याकडे आगामी काळात शिवसेना (UBT)ची अधिकृतपणे मोठी धुरा सोपवली जाणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

### गद्दार नेत्यांना जनता धडा शिकवणार

उद्धव ठाकरे हे लवकरच पक्षांतर केलेल्या त्या ६ खासदारांच्या मतदारसंघात प्रत्यक्ष दौरा करून जाहीर सभा घेणार आहेत. या दौऱ्याबाबत बोलताना राऊत यांनी बंडखोरांवर निशाना साधला. "पक्षाने ज्यांना मोठे केले, त्यांनी केवळ स्वार्थासाठी पाठीत खंजीर उपसला. मात्र, जनता गद्दारी विसरत नाही. शिवसेना आजही जनतेच्या मनात जिवंत असून, आगामी काळात हे सिद्ध होईल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी ‘एअर सुविधा २.०’

## इबोला विषाणूच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी फॉर्म भरणे अनिवार्य

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**आफ्रिकेतील इबोला विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे भारत सरकारने विमानतळांवर प्रवाशांच्या देखरेखीसाठी कडक पावले उचलली आहेत. नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने २५ जून २०२६ पासून ‘एअर सुविधा २.०’ हे डिजिटल पोर्टल सुरू केले आहे. या अंतर्गत आता भारतात येणाऱ्या सर्व आंतरराष्ट्रीय प्रवाशांना प्रवासापूर्वी ऑनलाईन आरोग्य स्वयंघोषणापत्र भरणे अनिवार्य करण्यात आले आहे.**




सर्व आंतरराष्ट्रीय प्रवाशांना यामध्ये युएई व इतर देशांमधून येणाऱ्या भारतीयांचाही समावेश आहे. त्यांचा प्रवास सुरू होण्यापूर्वी २४ तास आधी AIRSUVIDHA.CIVILAVIATION.GOV.IN या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन हा फॉर्म भरावा लागेल. प्रवाशांनी वेब चेक-इन करतानाच हा फॉर्म भरावा, जेणेकरून विमानतळावर त्यांचा वेळ वाचेल.

या फॉर्ममध्ये प्रवाशांना प्रामुख्याने पुढील तीन गोष्टींची माहिती द्यावी लागेल. त्यामध्ये गेल्या २१ दिवसांच्या प्रवासाची माहिती, इबोला प्रभावित भागात भेट दिली आहे का, याची माहिती आणि ताप, अंगदुखी किंवा अंगातून रक्तस्त्राव होणे यांसारखी कोणतीही लक्षणे आहेत का?

हा फॉर्म पूर्णपणे ऑनलाईन आहे. प्रवाशांनी ऑनलाईन फॉर्म भरल्यानंतर त्याची डाऊनलोड केलेली प्रत विमानतळावरील ‘इंटरनॅशनल ट्रॅव्हल हेल्थ डेस्क’ किंवा इमिग्रेशन काउंटरवर दाखवणे आवश्यक आहे. विमानतळावर कोणताही कागदी फॉर्म भरण्याची गरज पडणार नाही. या पोर्टलवरील माहिती रिअल-टाइममध्ये विमानतळ आरोग्य अधिकारी आणि राज्य आरोग्य यंत्रणेकडे पोहोचेल, ज्यामुळे संशयित रुग्णांना शोधणे सोपे होईल. १७ मे २०२६ रोजी जागतिक आरोग्य संघटनेने काँगो (DRC) आणि युगांडामधील इबोला उद्रेकाला ‘आंतरराष्ट्रीय चिंतेची सार्वजनिक आरोग्य आणीबाणी’ म्हणून घोषित केले आहे. हा इबोलाचा ‘बुंदिबुग्यो’ हा अत्यंत दुर्मिळ प्रकार असून, यावर सध्या कोणतीही मंजूर लस किंवा खात्रीशीर उपचार उपलब्ध नाहीत. त्यामुळे संसर्ग भारतात पसरू नये म्हणून ही खबरदारी घेतली जात आहे.

### इबोलाचा धोका किती?

इबोला हा बाधित व्यक्तीच्या शरीरातील द्रव्यांच्या लाळ, रक्त इत्यादी संपर्कात आल्याने पसरतो. गेल्या ५ दशकात या आजारामुळे आफ्रिकेत १५,००० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. सध्याचा उद्रेक नियंत्रणात आणण्यासाठी जागतिक आरोग्य संघटना आणि आफ्रिकन सिडीसी ने ५१८ दशलक्ष डॉलर्सचा निधी जाहीर केला आहे. भारतात येण्यापूर्वी २४ तास आधी ‘एअर सुविधा २.०’ फॉर्म नक्की भरा. भारतात विमानतळावर अतिरिक्त तपासणीसाठी तयार राहा.

# चीनमध्ये विजेच्या बिलामुळे उघडकीस आली घरातील अजगरांची फॅक्टरी


**महाईन्यूज । चीन**

**एका डोंगराच्या पायथ्याशी दिसलेल्या एका साध्या सापाने पोलिसांना थेट अशा अड्डयावर पोहोचवले, जिथे एका फ्लॅटमध्ये तब्बल ३०९ अजगर बेकायदेशीरपणे पाळले आणि पैदास केले जात होते. चीनच्या झेजियांग प्रांतात ही धक्कादायक घटना समोर आली आहे. मार्च २०२४ मध्ये एका वृद्ध नागरिकाला डोंगराच्या पायथ्याशी एक मोठा अजगर दिसला.**




या भागात सामान्यतः अजगर आढळत नाहीत आणि त्या ऋतूत साप सुप्त अवस्थेत असतात. त्यामुळे हा साप कोणाच्या तरी तावडीतून सुटल्याचा संशय पोलिसांना आला. पोलीसांनी मालकाचा शोध सुरू केला, पण यश येत नव्हते.

तपासादरम्यान एका सर्पतज्ज्ञाने पोलिसांना एक महत्त्वाची टीप दिली. त्यांनी सांगितले की, अजगरांना जिवंत राहण्यासाठी आणि त्यांची पैदास होण्यासाठी वर्षभर प्रचंड उष्ण व दमट वातावरणाची गरज असते. यासाठी घरात मोठ्या प्रमाणावर हीटर्स आणि उपकरणे वापरावी लागतात, ज्यामुळे विजेचा वापर कमालीचा वाढतो. पोलीसांनी या धाग्यावरून परिसरातील वीज वापराच्या नोंदींची तपासणी सुरू केली. यात ‘गुओ’ नावाच्या व्यक्तीच्या घरातील वीज वापर जास्त असल्याचे आढळले.



पोलीसांनी ‘गुओ’वर पाळत ठेवली असता, ‘डी’ नावाची दुसरी व्यक्ती त्याच्या घरी वारंवार जात असल्याचे दिसले. ‘डी’ नियमितपणे पांढरे उंदीर असलेले पार्सल मागवत असे. तसेच सोशल मीडियावर सापांचे फोटो टाकून त्यांच्या विक्रीचे केली जात होती. दोन सापांची बेकायदेशीर विक्री झाल्याचा पुरावा मिळताच पोलिसांनी गुओच्या फ्लॅटवर छापा टाकला.

चौकशीत गुओने कबुली दिली की त्याला सापांचे प्रचंड वेड होते. २०१४ मध्ये त्याने ४ अजगर खरेदी करून स्वतःच त्यांची पैदास कशी करायची हे शिकले. तो स्वतःला सापांचा ‘क्रिएटर’ समजत असे. आतापर्यंत या दोघांनी ८० अजगर विकले होते. पोलीसांनी या प्रकरणी त्यांना सुरुवातीला साप पुरवणाऱ्या ‘डेंग’ नावाच्या तिसऱ्या व्यक्तीलाही अटक केली असून, त्याच्या घरातूनही ४७ अजगर जप्त करण्यात आले आहेत. शेवटी वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, जप्त करण्यात आलेल्या सर्व अजगरांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले. या कारवाईमुळे बेकायदेशीर वन्यजीव व्यापाराचे मोठे रॅकेट उघडकीस आले असून, अशा प्रकारच्या गुन्ह्यांविरोधात प्रशासनाने अधिक कठोर कारवाईचा इशारा दिला आहे.

### घर बनवले सापांची फॅक्टरी


पोलीसांनी घरात पाऊल ठेवताच त्यांना धक्का बसला. गुओने आपल्या घराच्या हॉल आणि सर्व बेडरूम्सचे रूपांतर सापांच्या फॅक्टरीत केले होते. प्लास्टिकचे शेकडो कंटेनर एकावर एक रचून ठेवले होते आणि प्रत्येकात अजगर होता. गुओ स्वतः मात्र साऱ्या सापांमध्ये एका छोट्या खोलीत राहत होता. पोलीसांनी घरातून एकूण ३०९ अजगर जप्त केले आणि त्यांची रवानगी स्थानिक प्राणीसंग्रहालयात केली.



# ‘स्वयंपाक आणि साफसफाई ही फक्त महिलांची जबाबदारी नाही’



बॉलिवूडची ‘देसी गर्ल’ म्हणून ओळखली जाणारी अभिनेत्री प्रियांका चोप्रा केवळ अभिनयासाठीच नाही, तर विविध सामाजिक विषयांवर स्पष्ट आणि ठाम मत मांडण्यासाठीही प्रसिद्ध आहे. महिलांचे हक्क, समानता आणि समाजातील बदलत्या विचारांवर ती अनेकदा आपली भूमिका मांडताना दिसते. यावेळी तिने घरातील कामांची जबाबदारी आणि स्त्री-पुरुष समानतेबाबत महत्त्वाचे मत व्यक्त केले आहे. फ्रान्समध्ये झालेल्या कान्स लायन्स (Cannes Lions) या प्रतिष्ठित कार्यक्रमात बोलताना प्रियांकाने घरातील कामांवरून होणाऱ्या लिंगभेदावर भाष्य केले. तिच्या मते, स्वयंपाक करणे, साफसफाई करणे किंवा घराची देखभाल करणे ही केवळ महिलांची जबाबदारी नाही. ही प्रत्येक जबाबदार व्यक्तीची जबाबदारी आहे. प्रियांका म्हणाली की, आजही अनेक घरांमध्ये स्वयंपाक, धुणी-भांडी, साफसफाई आणि इतर घरकामे मुख्यतः महिलाच करताना दिसतात. समाजात अजूनही ही कामे महिलांचीच आहेत, असा समज अनेक ठिकाणी कायम आहे. मात्र, हा विचार बदलण्याची गरज असल्याचे तिने स्पष्टपणे सांगितले. तिने पुढे सांगितले की, घरातील कामे ही स्त्री किंवा पुरुष यावर ठरत नाहीत. प्रत्येकाने स्वतःच्या घराची आणि कुटुंबाची जबाबदारी समानपणे उचलली पाहिजे. स्त्री-पुरुष असा भेद करून घरातील कामांची विभागणी करणे योग्य नाही. तसेच घरकाम करण्याचा आळस आणि लिंगभेद या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. त्या एकत्र करून पाहू नयेत, असेही तिने स्पष्ट केले. प्रियांकाच्या या वक्तव्याचे सोशल मीडियावरही अनेकांनी स्वागत केले आहे. अनेकांनी तिच्या मताशी सहमती दर्शवत घरातील जबाबदाऱ्या सर्वांनी मिळून पार पाडल्या पाहिजेत, असे मत व्यक्त केले आहे. याच कार्यक्रमात प्रियांकाने मनोरंजन क्षेत्रातील बदलांवरही भाष्य केले. तिने सांगितले की, पूर्वी चित्रपटसृष्टीत प्रवेश करणे खूप कठीण होते. एखाद्या विशिष्ट क्षेत्रात काम करण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत असे. मात्र, आज तंत्रज्ञानामुळे प्रत्येकाला आपली कला दाखवण्याची संधी मिळत आहे.



## नवऱ्यापासून विभक्त झाल्यानंतर स्पष्टचं बोलली ईशा देओल

बॉलिवूड अभिनेत्री ईशा देओल फारशी इंडस्ट्रीत सक्रिय नसली तरी ती तिच्या खाजगी आयुष्यातील काही महत्वाच्या गोष्टी सोशल मीडियाच्या माध्यमातून चाहत्यांसोबत नेहमी शेअर करत असते. गेल्या काही दिवसांपूर्वी तिचा भाऊ अभिनेता बॉबी देओल याचा बंदर चित्रपट रिलीज करण्यात आला होता. या चित्रपटाला प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिले. ईशाने देखील हा चित्रपट पाहिला आणि बॉबीच्या कामाचं कौतुक केलं. यासंदर्भात तिने सोशल मीडियावरुन एक पोस्ट शेअर केली होती. आता नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीमुळे ईशा चर्चेत आली आहे. या मुलाखतीत तिने आपल्या खाजगी आष्युबाबत मनमोकळेपणाने भाष्य करत आपलं मतं मांडलं. ईशाने बॉलिवूडमध्ये काही मोजक्याच चित्रपटांमध्ये काम केले आहे. आता ती फारशी कुठे चित्रपटांमध्ये दिसत नाही. २०२४ मध्ये तिने एक मोठा निर्णय घेतला होता. त्या निर्णयामुळे तिच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला होता. ईशाने देओलने तिचा पती भरत तख्तानी यांच्यापासून परस्पर संमतीने विभक्त होण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाविषयी तिने आपला विचार मुलाखतीत  मांडला. ईशा म्हणाली की, “अशा गोष्टी अत्यंत वैयक्तिक असतात आणि त्यात मुलांचाही विचार करावा लागतो. ही दोन व्यक्तींमधील बाब असते. मात्र, आम्ही सार्वजनिक आयुष्यात असल्यामुळे प्रत्येक गोष्ट चर्चेचा विषय बनते. आम्हाला आमचं खासगी आयुष्य सार्वजनिक करायला आवडत नाही. त्या काळात आम्हाला प्रत्येक पाऊल अतिशय विचारपूर्वक उचलावं लागलं, कारण आमची मुलंही या निर्णयाचा भाग होती.” ईशाने पुढे असंही सांगितलं की, “काहीवेळा लोक तुमच्या निर्णयाशी सहमत नसतात. पण प्रत्येक नात्याची स्वतःची कहाणी असते. जर दोन चांगल्या व्यक्तींनी वेगळं होण्याचा निर्णय घेतला, तर परस्पर आदर आणि समजूतदारपणाने पुढचा मार्ग नक्कीच शोधता येतो.” तसेच कठीण काळात कुटुंबाने दिलेल्या पाठिंब्याचाही तिने उल्लेख केला. विभक्त होण्याच्या निर्णयाबाबत संभ्रमात असलेल्या महिलांना सल्ला देताना ती म्हणाली की, प्रत्येक नातं आणि प्रत्येक परिस्थिती वेगळी असते. त्यामुळे सर्वांसाठी एकच सल्ला योग्य ठरू शकत नाही.

## ‘नॅशनल क्रश’च्या लूकने चाहते घायाळ



मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री गिरिजा ओक पुन्हा एकदा तिच्या सुंदर आणि पारंपरिक लूकमुळे चर्चेत आली आहे. अभिनयासोबतच तिची स्टाईल, फॅशन सेन्स आणि साधेपणातील सौंदर्य चाहत्यांना नेहमीच आकर्षित करत असते. त्यामुळे अनेकजण तिला मराठी इंडस्ट्रीची ‘नॅशनल क्रश’ असेही म्हणतात. नुकतेच गिरिजाने सोशल मीडियावर काही खास फोटो शेअर केले असून, तिच्या या नव्या लूकचे सर्वत्र कौतुक होत आहे. या फोटोंमध्ये गिरिजा ओकने पिवळ्या रंगाची आकर्षक साडी परिधान केली आहे. साडीवर सोनेरी रंगातील प्राण्यांच्या आकृत्यांची सुंदर डिझाइन करण्यात आली आहे. पारंपरिक आणि आधुनिक शैलीचा सुंदर संगम या साडीत पाहायला मिळतो. साधेपणातही उठून दिसणारा हा लूक चाहत्यांच्या पसंतीस उतरला आहे. या साडीसोबत गिरिजाने डिझायनर हिऱ्यांचा नेकलेस आणि आकर्षक कानातले परिधान केले आहेत. दागिन्यांची निवड अगदी मोजकी पण उठावदार असल्यामुळे तिच्या संपूर्ण लूकला एक वेगळीच शालीनता प्राप्त झाली आहे. हेअरस्टाईलमध्येही गिरिजाने पारंपरिक अंदाज निवडला आहे. तिने केसांचा सुंदर आंबाडा बांधून त्यावर मोगऱ्याचा गजरा माळला आहे. त्यामुळे तिच्या लूकमध्ये मराठमोळा आणि पारंपरिक साज अधिक खुलून दिसत आहे.

# वैभव सूर्यवंशी प्लेईंग ११ मधून बाहेर!

## आयर्लंडविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात पदार्पणाची प्रतीक्षा लांबली

**महाईन्यूज | आयर्लंड**

**भारताचा संघ सध्या आयर्लंड दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये २ टी-२० सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. या मालिकेतील पहिला सामना बेलफास्टमध्ये सुरु आहे. या सामन्याआधी २ गोष्टी तुफान चर्चेत होत्या, ते म्हणजे सूर्यकुमार यादवला टी-२० संघाच्या कर्णधारपदावरुन काढल्यानंतर हा पहिलाच सामना असणार आहे. तर दुसरीकडे १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीला पदार्पण करण्याची संधी मिळणार का? आयपीएल गाजवल्यानंतर त्याला पहिल्याच सामन्यात संधी मिळण्याची शत्यता होती. पण असं काहीच झालेलं नाही. वैभवला पहिल्या सामन्यात पदार्पण करण्याची संधी मिळालेली नाही. नाणेफेकीच्या वेळी श्रेयस अय्यरने त्याला प्लेईंग ११ मध्ये स्थान न देण्यामागचं कारण सांगितलं आहे.**





बेलफास्टमध्ये सुरु असलेल्या या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. नाणेफेक झाल्यानंतर ज्या क्षणाची सर्वच क्रिकेट चाहते आतुरतेने वाट पाहत होते, तो क्षण आला. श्रेयसला वैभव सूर्यवंशी प्लेईंग ११ मध्ये आहे का? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी श्रेयस अय्यर म्हणाला, "दुर्दैवाने, नाही. तो अप्रतिम आणि स्फोटक फलंदाज आहे. पण आमच्या संघात एकापेक्षा एक अनुभवी खेळाडू आहेत. या खेळाडूंनी गेल्या काही महिन्यांमध्ये भारतीय संघासाठी दमदार कामगिरी केली आहे. त्यामुळे आम्ही आमच्या अनुभवी खेळाडूंना पाठिंबा देत आहोत. ज्यांनी संपूर्ण हंगामात दमदार कामगिरी केली आहे. त्यामुळे मला वाटतं की, जेव्हा योग्य वेळ येईल, तेव्हा त्याला संधी मिळेल. पण सध्या आम्ही ३ प्रमुख वेगवान गोलंदाज, १ अष्टपैलू आणि २ फिरकी गोलंदाजांना स्थान दिलं आहे."

### वैभव सूर्यवंशी चर्चेत का?

आयपीएलच्या हंगामात आपल्या स्फोटक आणि आक्रमक फलंदाजीने अवघ्या १५ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. इतक्या लहान वयात भारतीय संघात निवड झाल्यामुळे तो जागतिक क्रिकेटमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे. त्याला पहिल्याच सामन्यात खेळताना पाहण्यासाठी भारतीय क्रिकेट चाहते कमालीचे उत्सुक होते, मात्र आता त्याला आंतरराष्ट्रीय पदार्पणासाठी पुढील सामन्याची वाट पाहावी लागणार आहे.

---

# चार वर्ल्डकपविजेत्या जर्मनीविरुद्ध विजयाने इक्वेडोरमध्ये आनंदाची लाट

**महाईन्यूज | इक्वाडोर**

**फिफा वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत आतापर्यंत एकापेक्षा एक रोमांचक सामने पाहायला मिळाले आहेत. यासह अनेक मोठे उलटफेरही पाहायला मिळाले आहेत. त्यापैकीच एक उटलफेर म्हणजे इक्वेडोने बलाढ्य जर्मनीला पराभूत केलं आहे. इक्वेडोरने ४ वेळा वर्ल्ड चॅम्पिनय होण्याचा मान पटकावणाऱ्या जर्मनीवर २-१ ने विजय मिळवला आहे. या विजयासह इक्वेडोरने फिफा वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील बाद फेरीत आपलं स्थान निश्चित केलं आहे. या ऐतिहासिक विजयानंतर इक्वेडोरचे राष्ट्रपती डॅनियल नोबोआ यांनी मोठी घोषणा करत, एक दिवसाची सार्वजानिक सुट्टी जाहीर केली आहे.**



इक्वेडोरच्या ऐतिहासिक विजयानंतर राष्ट्रपती डॅनियन नोबोआने आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवरुन एक भावुक पोस्ट शेअर केली आहे. ही पोस्ट शेअर करुन त्यांनी संघातील खेळाडू आणि मुख्य प्रशिक्षकांचे आभार मानले आहेत. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, "खेळाडू आणि मुख्य प्रशिक्षंकाचे मनापासून आभार. इतकी टीका, अपमान आणि कठीण परिस्थिती असताना दमदार पुनरागमन केलं आणि देशाला आनंद साजरा करण्याची संधी दिली. उद्या (शुक्रवारी) देशात सुट्टी असेल."

इक्वेडोरसाठी हा प्रवास मुळीच सोपा नव्हता. या संघाने वर्ल्ड चॅम्पियन संघावर मात केली. पण याआधी इक्वेडोर संघाला आयवरी कोस्ट संघाकडून १-० ने पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यानंतर कुराकाओ संघाविरुद्ध झालेला सामना ड्रॉ राहिला होता. तर जर्मनीचा संघ आधीच बाद फेरीसाठी पात्र ठरला होता. त्यामुळे दबाव पूर्णपणे इक्वेडोर संघावर होता. पण इक्वेडोर संघातील खेळाडूंनी स्वत:वर कुठलाही दबाव येऊ दिला नाही. सामना जिंकण्यासाठी प्रबळ दावेदार मानल्या जाणाऱ्या जर्मनीवर दमदार विजय मिळवला.

या सामन्यातील सुरुवातीला जर्मनीने नेहमीप्रमाणे आक्रमक खेळ करत हल्ला चढवला. फ्लोरियन विट्जच्या पासवर लेरॉय सानेने दमदार गोल केला. सामन्यातील ९ व्या मिनिटाला इक्वेडोरने गोल केला आणि १-१ ने बरोबरी केली. पहिला हाफ १-१ ने बरोबरीत समाप्त झाला होता. त्यानंतर दुसऱ्या हाफमध्ये इक्वेडोरच्या खेळाडूंनी आणखी आक्रमक खेळ केला. सामना संपायला शेवटची १३ मिनिटे शिल्लक असताना, इक्वेडोरला कॉर्नर मिळाला. या संधीचं सोनं करुन गोंजालो प्लाटाने दमदार गोल केला आणि इक्वेडोरने २-१ आघाडी मिळवून दिली. शेवटच्या मिनिटांमध्ये जर्मनीने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला. पण इक्वेडोरने गोल करुच दिला नाही. शेवटी इक्वेडोरने हा सामना २-१ ने आपल्या नावावर केला.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। शनिवार ।
दि. 27 जून 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# पिंपरी-चिंचवडच्या गोकर्णाचा अभिमानास्पद 'सुवर्णयोग'!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

अहमदाबाद येथे पार पडलेल्या पहिली विश्व योगासन अजिंक्यपद स्पर्धा मध्ये पिंपरी-चिंचवडचा युवा योगपटू गोकर्णा शर्मा याने भारताचे प्रतिनिधित्व करत दैदिप्यमान कामगिरी केली. सब-ज्युनिअर मुलांच्या गटात गोकर्णाने बॅक बेंडिंग वैयक्तिक प्रकार तसेच पारंपरिक सांघिक प्रकार या दोन प्रकारांमध्ये सुवर्णपदके पटकावत भारताला दुहेरी यश मिळवून दिले.

जगभरातील अनेक देशांतील उत्कृष्ट योगपटूंनी सहभाग घेतलेल्या या ऐतिहासिक स्पर्धेत गोकर्णाने आपली विलक्षण लवचिकता, अचूक संतुलन, ताकद आणि तांत्रिक योगकौशल्य यांचे प्रभावी सादरीकरण केले. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे आंतरराष्ट्रीय मंचावर भारताचा तिरंगा अभिमानाने फडकला.

वाकड येथील विज्डम वर्ल्ड स्कूल चा विद्यार्थी असलेला गोकर्णा सध्या दृष्टी योग अकादमी येथे नियमित प्रशिक्षण घेत आहे. योग प्रशिक्षक सिद्धार्थ शिंदे आणि शरयू नरुटे यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्यपूर्ण सराव, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि कठोर मेहनतीच्या जोरावर त्याने हे अभूतपूर्व यश संपादन केले.

पहिल्याच विश्व योगासन स्पर्धेत दोन सुवर्णपदके जिंकण्याची गोकर्णाची कामगिरी केवळ वैयक्तिक यशापुरती मर्यादित नसून ती देशातील युवा खेळाडूंसाठी प्रेरणादायी ठरत आहे. योगासन हा खेळ जागतिक स्तरावर वेगाने विस्तारत असताना, गोकर्णासारख्या प्रतिभावान खेळाडूंची कामगिरी भारताच्या योगपरंपरेला नवी ओळख मिळवून देणारी आहे.


गोकर्णाच्या या यशामुळे पिंपरी-चिंचवड शहरासह संपूर्ण महाराष्ट्राच्या योगक्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, सर्व स्तरांतून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्याच्या पुढील वाटचालीसाठी क्रीडाप्रेमी, शिक्षक, प्रशिक्षक आणि नागरिकांकडून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

### दुहेरी सुवर्ण-पदकाची कामगिरी

पहिल्या विश्व योगासन अजिंक्यपद स्पर्धेत पिंपरी-चिंचवडच्या गोकर्णा शर्मा याने भारताचे प्रतिनिधित्व करत सब-ज्युनिअर मुलांच्या गटातील बॅक बेंडिंग वैयक्तिक आणि पारंपरिक सांघिक प्रकारात प्रत्येकी एक अशी दोन सुवर्णपदके जिंकली. वाकड येथील विज्डम वर्ल्ड स्कूलचा विद्यार्थी असलेला गोकर्णा दृष्टी योग अकादमीमध्ये प्रशिक्षक सिद्धार्थ शिंदे आणि शरयू नरुटे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत असून, त्याच्या या यशामुळे पिंपरी-चिंचवड आणि महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.




D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform
ADMISSION OPEN
A.Y. 2026



*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*

*UG/PG Programs*
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# ‘संतपीठ फेज-२’ची रखडलेली कामे तातडीने पूर्ण करा!

## भाजपचे आमदार महेश लांडगे यांची महापालिका प्रशासनाला सूचना

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका संचलित जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, टाळगाव चिखली येथील फेज-२ अंतर्गत सुरू असलेली सर्व प्रलंबित व अपूर्ण विकासकामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत, अशी मागणी भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे केली आहे.**






यासंदर्भात आयुक्तांना दिलेल्या निवेदनात आमदार लांडगे यांनी म्हटले आहे की, विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र, फेज-२ मधील अनेक आवश्यक कामे अद्याप अपूर्ण असल्याने शाळेच्या दैनंदिन कामकाजावर, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेवर आणि उपलब्ध सुविधांच्या प्रभावी वापरावर परिणाम होत आहे. शाळा प्रशासनाने वारंवार पाठपुरावा करूनही संबंधित कामांची पूर्तता झालेली नसल्याची बाब त्यांनी निदर्शनास आणून दिली.

प्रलंबित कामांमध्ये इमारतीचे इलेव्हेशन, सोलर प्रणाली, लिफ्ट कार्यान्वित करणे, सीसीटीव्ही व्यवस्था, बेसमेंटमधील उर्वरित कामे, अग्निशमन यंत्रणा, केबिनची कामे, खेळाचे मैदान, कंपाऊंड वॉल, गणित व भूगोल प्रयोगशाळा, डान्स रूम, इलेक्ट्रिकल कामे, नोटीस बोर्ड, सेफ्टी डोअर तसेच सभागृहाची अपूर्ण कामे यांचा समावेश असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह शैक्षणिक गुणवत्तेच्या दृष्टीने ही सर्व कामे अत्यावश्यक असल्याने संबंधित विभागाला आवश्यक निधी, मनुष्यबळ आणि साहित्य उपलब्ध करून देत फेज-२ मधील सर्व अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली आहे. तसेच या विषयाला प्राधान्य देऊन महापालिका प्रशासनाने तातडीने आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

> जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ हे भविष्यातील गुणवंत विद्यार्थी घडविणारे महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र आहे. देशातील पहिले संतपीठ पिंपरी-चिंचवडमध्ये उभारण्यात आले. त्यामध्ये अडीच हजाराहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अध्यात्म, वारकरी सांप्रदाय आणि आधुनिक शिक्षणाचा संगम म्हणजे संतपीठ आहे. या संकुलात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी आणि शिक्षणाच्या गुणवत्तेशी कोणतीही तडजोड होऊ देणार नाही. फेज-२ मधील सर्व प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून प्रभावी पाठपुरावा करून ती निश्चित पूर्ण करणार आहोत.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा.**

# ३ लाख ६२ हजारांहून अधिक मालमत्ताधारकांनी घेतला विविध सवलतींचा लाभ

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत मालमत्ता कर भरण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या विविध सवलत योजनांना शहरातील नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत आतापर्यंत सुमारे ३ लाख ८० हजारांहून अधिक मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराचा भरणा केला असून त्यापैकी ३ लाख ६२ हजार ५७ मालमत्ताधारकांनी महापालिकेच्या विविध सवलतींचा लाभ घेतला आहे. सवलतींचा लाभ घेण्यासाठी आता केवळ ५ दिवसांचा कालावधी शिल्लक असून नागरिकांनी ३० जून २०२६ पूर्वी कर भरून उपलब्ध सवलतींचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.**



> पिंपरी चिंचवडकरांनी वेळेत मालमत्ता कर भरून शहराच्या विकासात नेहमीच मोलाची भागीदारी नोंदवली आहे. यंदाही नागरिकांनी सवलत योजनांना दिलेला प्रतिसाद हा महापालिकेवरील विश्वासाचे प्रतीक आहे. प्रत्येक जबाबदार करदाता हा शहराचा विकास भागीदार आहे.
>
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

> मालमत्ता कर संकलनातील सातत्यपूर्ण वाढ ही महापालिकेच्या महसूल व्यवस्थापनाच्या दृष्टीने सकारात्मक बाब आहे. करदात्यांच्या सोयीसाठी विविध सवलती, ऑनलाइन करभरणा सुविधा तसेच क्षेत्रीय कार्यालयांमार्फत आवश्यक सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. उपलब्ध सवलतींचा लाभ अधिकाधिक मालमत्ताधारकांनी घ्यावा आणि ३० जूनपूर्वी मालमत्ता कराचा भरणा करून कर संकलन मोहिमेस सहकार्य करावे.
>
> **- डॉ. विजय सुर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

महापालिकेकडून ३० जून २०२६ पूर्वी मालमत्ता कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांसाठी विविध प्रोत्साहनपर सवलती लागू करण्यात आल्या आहेत. यामध्ये ऑनलाईन आगाऊ कर भरण्यावर मिळणाऱ्या १० टक्के सवलतीला सर्वाधिक प्रतिसाद मिळाला असून ३ लाख ८ हजार ४५३ मालमत्ताधारकांनी डिजिटल माध्यमातून कराचा भरणा केला आहे. यामुळे नागरिकांचा ऑनलाइन सेवांकडे वाढता कल स्पष्टपणे दिसून येत आहे.

याशिवाय आगाऊ कर भरणा, महिला मालमत्ताधारक, दिव्यांग, माजी सैनिक, शौर्य पदकधारक, पर्यावरणपूरक उपक्रम राबविणारे तसेच प्रामाणिक करदाते अशा विविध गटांनाही महापालिकेच्या सवलत योजनांचा लाभ मिळाला आहे.

महापालिका क्षेत्रात सध्या ७ लाख ४४ हजारांहून अधिक मालमत्तांची नोंद असून त्यापैकी ३ लाख ८० हजारांहून अधिक मालमत्ताधारकांनी आतापर्यंत ४३६ कोटी २० लाख रुपयांचा मालमत्ता कर भरला आहे.

### ३० जूनपर्यंत लागू असलेल्या सवलतींचा लाभ घेतलेले मालमत्ताधारक

- ऑनलाईन आगाऊ भरणा – ३ लाख ८ हजार ४५३
- प्रामाणिक करदाता – ४६ हजार ९७३
- पर्यावरणपूरक सवलत – ४१ हजार ६४०
- आगाऊ भरणा – ३१ हजार ५११
- महिला – १६ हजार ३१४
- माजी सैनिक – ३ हजार ९९४
- दिव्यांग – १ हजार ७८२
- शौर्य पदकधारक – ३
- **एकूण लाभार्थी – ३ लाख ६२ हजार ५७**



# रविवारी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम!

## ५ वर्षांखालील सर्व बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्याचे आवाहन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैद्यकीय विभागामार्फत उद्या रविवार, दि. २८ जून रोजी संपूर्ण शहरात 'राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण' मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत शहरातील ० ते ५ वर्षांखालील सर्व बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब देण्यात येणार असून, पालकांनी आपल्या बालकांना जवळच्या पोलिओ लसीकरण केंद्रावर घेऊन जाऊन लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन महापालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत करण्यात आले आहे.**



शहरात सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत एकूण ११२३ पोलिओ लसीकरण केंद्रांवर ही मोहीम राबविण्यात येणार आहे. त्यानंतर दि. २९ जून ते ३ जुलै २०२६ या कालावधीत आरोग्य कर्मचारी घरभेटी देऊन लसीकरणापासून वंचित राहिलेल्या बालकांना पोलिओचा डोस देणार आहेत.

ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी ८ विभागीय प्रभारी वैद्यकीय अधिकारी, ९५ वैद्यकीय अधिकारी, ३१९ पर्यवेक्षक आणि ४५५२ लसीकरण कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. याशिवाय एएनएम, एमपीडब्ल्यू, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका व मदतनीस, विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी, महिला आरोग्य समिती सदस्य, रोटरी क्लबचे स्वयंसेवक आणि इतर स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी या मोहिमेत सहभागी झाले आहेत.

शहरातील सर्व महापालिका दवाखाने, रुग्णालये, मोठी खासगी रुग्णालये, अंगणवाडी केंद्रे, बस स्थानके, रेल्वे स्थानके, मेट्रो स्थानके तसेच स्थलांतरित नागरिकांच्या वस्त्यांमध्ये पोलिओ लसीकरणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

> "पोलिओमुक्त भारताचे यश कायम राखण्यासाठी प्रत्येक पालकाने ही आपली सामाजिक जबाबदारी समजून मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा. रविवार, दि. २८ जून रोजी आपल्या ० ते ५ वर्षांखालील बालकाला जवळच्या पोलिओ लसीकरण केंद्रावर घेऊन जाऊन पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब अवश्य पाजावेत.
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी**, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

### पोलिओचे दोन थेंब का आवश्यक?

- पोलिओसारख्या गंभीर आजारापासून प्रभावी संरक्षण मिळते.
- पक्षाघाताचा धोका कमी होण्यास मदत होते.
- बालकाची रोगप्रतिकारक क्षमता अधिक बळकट होते.
- निरोगी, सुरक्षित आणि आनंदी बालपणासाठी संरक्षण मिळते.
- भारताचा पोलिओमुक्त दर्जा कायम राखण्यास हातभार लागतो.
- यापूर्वी पोलिओचे सर्व डोस घेतले असले, तरी राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेतील डोस घेणे आवश्यक असते.
- नवजात तसेच किरकोळ आजारी असलेल्या बालकांनाही पोलिओची लस सुरक्षितपणे देता येते.

## भोसरीत बीएलओंना प्रशिक्षण; ३० जूनपासून मतदार पडताळणी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

२०७ भोसरी विधानसभा मतदारसंघातील विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेच्या तयारीसाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) आणि नवनियुक्त सहाय्यक मतदान नोंदणी अधिकाऱ्यांचे एकदिवसीय प्रशिक्षण शिबिर आचार्य अत्रे रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आले. मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि त्रुटीरहित करण्याच्या उद्देशाने हे प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षणात भारतीय निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेच्या कालबद्ध कार्यक्रमाची माहिती देण्यात आली. प्रगणना पत्रक भरण्याची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी तसेच घरभेटीदरम्यान घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

भोसरी विधानसभा मतदारसंघात सध्या ६ लाख ३६ हजार ४२४ मतदार असून मतदार यादीतील मॅपिंगचे प्रमाण ५८.६६ टक्के आहे. मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी ४८३ बीएलओ आणि ४८ पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. ३० जून ते २९ जुलै या कालावधीत बीएलओ घरभेटी देऊन मतदारांची माहिती पडताळणार आहेत. या वेळी प्रगणना पत्रके भरून घेण्यात येणार असून मतदार यादीतील नोंदी अद्ययावत करण्यासाठी आवश्यक माहिती संकलित केली जाणार आहे.

मतदार नोंदणी अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी सचिन पाटील यांनी सांगितले की, मतदार यादी अद्ययावत आणि त्रुटीरहित ठेवण्यासाठी घरभेटींच्या माध्यमातून माहिती संकलित केली जाणार आहे. नागरिकांनी प्रगणना पत्रकातील माहिती काळजीपूर्वक तपासून आवश्यक कागदपत्रांसह बीएलओंना सहकार्य करावे. प्रगणना पत्रकात अद्ययावत मोबाईल क्रमांक नमूद करावा. कुटुंबातील सदस्यांचे मॅपिंग चुकीचे असल्यास अथवा इतर विसंगती आढळल्यास ती बीएलओंच्या निदर्शनास आणून द्यावी. आवश्यक तेथे संबंधित कागदपत्रे सादर करून विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन तहसीलदार तथा तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी सतीश थेटे यांनी केले.

## प्रतिभा इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'स्विच रायफल शूटिंग रेंज व पिस्टल सुविधा'चे उद्घाटन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**चिंचवड येथील प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या प्रतिभा इंटरनॅशनल स्कूलमध्ये अत्याधुनिक 'स्विच रायफल शूटिंग रेंज आणि पिस्टल प्रशिक्षण सुविधा'चे औपचारिक उद्घाटन उत्साहात पार पडले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना सुरक्षित व शास्त्रीय मार्गदर्शनाखाली नेमबाजी क्रीडा प्रकार शिकण्याची संधी उपलब्ध होणार आहे.**



या सुविधेचे उद्घाटन प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या खजिनदार डॉ. भूपाली शहा यांच्या हस्ते आणि प्रतिभा इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या डॉ. वृंदा जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी सोहळ्याला संस्थेच्या संचालिका डॉ. तेजल शहा, शाळेच्या उपप्राचार्या लिजा सोजू, समन्वयीका गुलनाज खान, प्रशिक्षक विजय झुंजारे, राष्ट्रीय खेळाडू प्रमिला कांबळे, डायनॅमिक स्पोर्टस फाउंडेशनचे संस्थापक रमेश वराडे, ज्योती वराडे, किर्ती मिसळ, प्रतीक पांचाळ, भुषण पाटील, आर्या, प्राध्यापक व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ही अत्याधुनिक शूटिंग रेंज विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांच्या दूरदृष्टीतून व मार्गदर्शनाखाली उभारण्यात आली आहे. प्रशिक्षित प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करून विद्यार्थ्यांना नेमबाजीचे प्रशिक्षण देण्याविषयी योग्य सुचना व भावी वाटचालीस शुभेच्छा त्यानी दिल्या आहेत. शालेय विद्यार्थाना पिंपरी चिंचवड रायफल शूटिंग चे प्रशिक्षक विजय रणझुंजारे याच्याकडून दिले जाणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन करताना डॉ. भूपाली शहा म्हणाल्या, नेमबाजी प्रशिक्षणातून विद्यार्थ्याच्या दैनदीन अभ्यासाबरोबरच त्याचे व्यक्तिमत्व धडण्यास मदत होईल. या प्रशिक्षण सुविधामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, शिस्त, अचूकता, आत्मविश्वास आणि खेळाडूवृत्ती वाढविण्यास मदत करेल. क्रीडा हे केवळ शारीरिक आरोग्यासाठी नसून मानसिक दृढतेसाठीही अत्यावश्यक आहे."

शाळेच्या प्राचार्या डॉ. वृंदा जोशी यांनी सांगितले की, "आजच्या स्पर्धेच्या युगात येथे शिक्षण घेणारे शालेय विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासापुरते मर्यादित न ठेवता क्रीडा, कला व इतर क्षेत्रात प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. ही शूटिंग रेंज त्याच दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे."

संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा, संचालिका डॉ. तेजल शहा यांनी शाळा प्रशासनाला दिलेल्या या रेंजमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची उपकरणे वापरली गेली असून, प्रत्येक सत्रापूर्वी विद्यार्थ्यांना सुरक्षा नियमांचे पालन करून प्रशिक्षण चे नियम प्रत्येकाला बंधनकारक असेल. तसेच त्याची सुरक्षितताही महत्वाची असेल. ही सुविधा शालेय विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध जीवनशैलीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. या उपक्रमामुळे प्रतिभा इंटरनॅशनल स्कूलने क्रीडा क्षेत्रात आणखी एक मैलाचा दगड गाठला आहे.


Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL
GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com
1
KM
From Talegaon Railway Station